cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

अ

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१४१ | सोमवार दि.१० ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### पंतप्रधानांची भेट घेणार–सुप्रिया सुळे

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोकसभेतील सर्व आठही खासदार आम्ही महाराष्ट्राच्या प्रश्नांसाठी आणि विकासकामांसाठी रीतसर वेळ मागून देशाच्या पंतप्रधानांची भेट घेणार आहोत. ते केवळ एका पक्षाचे पंतप्रधान नाहीत, तर संपूर्ण देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीचे फोटोही आम्ही तुम्हाला नक्की देऊ, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबई येथे पत्रकारांची संवाद साधताना सांगितले. सुप्रिया सुळे म्हणाल्या की,पंतप्रधान हे सगळ्या पक्षांच्या खासदारांना नियमितपणे भेटतात.आम्हीही लोकप्रतिनिधी म्हणून आमच्या मतदारसंघातील आणि महाराष्ट्राच्या विकासाच्या कामांसाठी अधिकृतपणे पंतप्रधानांची भेट घेणार आहोत. ते देशाचे पंतप्रधान आहेत, त्यामुळे त्यांना भेटून राज्याचे प्रश्न मांडणे हा आमचा अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले.

### डोनाल्ड ट्रम्प यांची गाझा शांतता योजना फेटाळली

दिल्ली: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'बोर्ड ऑफ पीस'ने घोषित केलेली गाझासाठीची १५ कलमी योजना इस्रायलने फेटाळली आहे. हमासचे पूर्णपणे नि:शस्त्रीकरण होईपर्यंत इस्रायल आपले सैन्य मागे घेणार नाही, असं पंतप्रधान बिन्यामिन नेतन्याहू यांनी रविवारी सांगितले. गेल्या महिन्यात हमासने मंजुरी दिलेल्या योजनेचा उल्लेख करत नेतन्याहू मंत्रिमंडळाच्या बैठकीत म्हणाले, ''इस्रायल १५ कलमी दस्तऐवज फेटाळत आहे.'' हमासचे खऱ्या अर्थाने नि:शस्त्रीकरण होत नाही तोपर्यंत इस्रायली सैन्य माघार घेणार नाही आणि आमच्या सैन्याविरुद्ध व नागरिकांविरुद्धचे धोके हाणून पाडणे सुरूच ठेवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. नेतन्याहू यांचे हे वक्तव्य गाझा युद्ध संपवण्याच्या ट्रम्प यांच्या प्रयत्नांना मोठा धक्का मानला जात आहे.

### शेतकऱ्यांना संमतिपत्रासाठी ३१ ऑगस्टची अंतिम मुदत

पुणे: पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील बाधित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी उभारण्यात येणाऱ्या एरोसिटीच्या भूसंपादनाचे संमतीपत्रे सादर करण्यासाठी आता ३१ ऑगस्टपर्यंतची अंतिम संधी देण्यात आली आहे. मुदतीनंतर सक्तीने भूसंपादन करण्यात येईल, असा इशारा जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला. बहुप्रतीक्षित पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी सात बाधित गावांमधून भूसंपादन करण्याची कार्यवाही सुरू आहे. यामध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मोबदल्यापोटी एकूण जमिनीच्या १० टक्के किंवा किमान १० गुंठे विकसित भूखंड देण्यात येणार आहे. त्यासाठी अतिरिक्त जमीन संपादित करावी लागणार आहे. विमानतळ प्रकल्पासाठी यापूर्वी निश्चित केलेल्या १,२१८.७५ हेक्टर क्षेत्रातील बाधित खातेदारांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) कायद्यातील तरतुदीनुसार भूसंपादन करण्यात येणार आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०८ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३३.५० क्विंटल | २,४०० | २,७०० | २,६०३ |
| ज्वारी/हायब्रिड : ४१.५० क्विंटल | २,४८० | ४,३०० | ३,२५३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | २,१८० | २,१८० | २,१८० |
| तूर : १.०० क्विंटल | ३,८६० | ४,००० | ३,९३० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ६.५० क्विंटल | २,५८० | २,८९० | २,७५६ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: ६.०० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |

# बोगस खतांचा शेतकऱ्यांना फटका

## ९३ लाखांचा ४१५ मेट्रिक टन साठा जप्त, छत्रपती संभाजीनगर विभागात ९ जणांवर गुन्हे; ११४ नमुन्यांवर न्यायालयीन कारवाई

छत्रपती संभाजीनगर

**संभाव्य दुष्काळजन्य परिस्थिती, वाढता उत्पादन खर्च आणि खरीप हंगामातील पिकांच्या वाढीसाठी खतांची वाढती गरज असतानाच शेतकऱ्यांची बोगस व निकृष्ट खतांच्या माध्यमातून फसवणूक होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांत कृषी विभागाने बोगस व निकृष्ट खतांविरोधात धडक मोहीम राबवली असून, आतापर्यंत ९ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच ९३ लाख ३४ हजार रुपये किमतीचा ४१५.५० मेट्रिक टन खतसाठा जप्त करण्यात आला आहे.**



खरीप हंगामाच्या सुरुवातीपासूनच कृषी विभागाने बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. विभागातील तीन जिल्ह्यांत एकूण ७ हजार १४ खत विक्रेते असून, त्यापैकी आतापर्यंत ६ हजार ४४ विक्रेत्यांच्या दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. या तपासणीदरम्यान विभागीय गुणनियंत्रण पथकाने १ हजार २०५ खतांचे नमुने संकलित करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले. त्यापैकी १३५ नमुने सदोष आढळले असून, यातील ११४ नमुने न्यायालयीन कारवाईसाठी पात्र ठरले आहेत. आतापर्यंत तीन प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत. तपासणीमध्ये नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खत विक्रेत्यांवरही कृषी विभागाने कठोर कारवाई केली आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांत ५७ खत विक्रेत्यांना खत विक्रीस बंदी घालण्यात आली आहे. तसेच बोगस खताची विक्री, परवाना नसताना खतविक्री करणे आणि खताच्या बॅगेवर ◀◀ पान २ वर

# अबब राज्यात 526 शाळा अनधिकृत

## मुंबई विभागात सर्वाधिक ४५२, १५५ शाळांवर एफआयआर, ४३ शाळा बंद; शिक्षण विभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शैक्षणिक व्यवस्थेबाबत धक्कादायक माहिती समोर आली असून, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये महाराष्ट्रात तब्बल ५२६ शाळा अनधिकृतपणे सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, यापैकी तब्बल ४५२ शाळा मुंबई विभागातील आहेत. शासनाची मान्यता आणि यू–डायस क्रमांक घेणे बंधनकारक असतानाही नियमांचे उल्लंघन करून या शाळा सुरू असल्याचे माहितीच्या अधिकारातून समोर आले आहे.**

शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांना माहितीच्या अधिकाराअंतर्गत ही माहिती दिली आहे. राज्यातील अनधिकृत शाळांवर शिक्षण विभागाने कारवाई केली असली, तरी अनेक ठिकाणी अद्याप अशा शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश आणि शिक्षण सुरू असल्याने कारवाईच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. उपलब्ध माहितीनुसार, राज्यातील अनधिकृत शाळांपैकी ४३ शाळा बंद करण्यात आल्या आहेत. तसेच १५५ शाळांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला असून, ४२२ शाळांना नोटीस बजावण्यात आली अथवा दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. मुंबई विभागातील परिस्थिती सर्वाधिक गंभीर असल्याचे




आकडेवारीवरून दिसून येते. या विभागात तब्बल ४५२ अनधिकृत शाळांची नोंद झाली आहे. त्यापैकी २३ शाळा बंद करण्यात आल्या असून, १४९ शाळांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. तसेच ३९६ शाळांवर नोटीस किंवा दंडाची कारवाई करण्यात आली आहे. यानंतर पुणे विभागात ५३ अनधिकृत शाळा आढळल्या आहेत. त्यापैकी १४ शाळा बंद करण्यात आल्या असून, नऊ शाळांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. नागपूर विभागात ११ अनधिकृत शाळांची नोंद झाली असून, त्यापैकी पाच शाळा बंद करण्यात आल्या आहेत. चार शाळांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. नाशिक विभागात ◀◀ पान २ वर

### कारवाईनंतरही शाळा सुरूच?

शासनाची मान्यता नसलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देणे आणि शैक्षणिक कामकाज सुरू ठेवणे नियमबाह्य आहे. तरीही अनेक शाळांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे समोर आल्याने शिक्षण विभागाच्या कारवाईच्या परिणामकारकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अनधिकृत शाळांवर केवळ नोटीस, दंड किंवा एफआयआरपुरती कारवाई न करता, अशा संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याचीही जबाबदारी शिक्षण विभागाला घ्यावी लागणार आहे. त्यामुळे अनधिकृत शाळांवर कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्याची गरज व्यक्त होत आहे.



# ममता बॅनर्जींच्या ताफ्यावर हल्ला

## गाडीवर चिखल, चप्पल, बूट फेकले

कोलकाता । वृत्तसंस्था

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना रविवारी (दि. ९) उत्तर २४ परगणा जिल्ह्यात तीव्र विरोधाचा सामना करावा लागला. एका मृत तृणमूल कार्यकर्त्याच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी जात असताना आंदोलकांनी त्यांच्या ताफ्याला घेरले. या वेळी आंदोलकांनी चोर–चोरच्या घोषणा देत त्यांच्या गाडीवर चिखल फेकल्याचा आरोप आहे. ही घटना बीजपूर येथे घडली.

मृत पक्ष कार्यकर्त्याच्या घरी जात असताना आंदोलकांच्या एका गटाने ममता बॅनर्जी यांच्या वाहनाला घेराव घातला. माध्यमांशी बोलताना बॅनर्जी म्हणाल्या, ''माझ्या गाडीवर दगड, शूज आणि चिखल फेकून हल्ला करण्यात आला आहे. हा पूर्णपणे एक कट आहे. मी येथे येत ◀◀ पान २ वर

# आंदोलकांवरील कारवाईबद्दल उत्तर द्यावेच लागेल !

## राहुल गांधींचा अमित शहांना थेट सवाल



दिल्ली । वृत्तसंस्था

**विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या कारवाईवरून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पुन्हा लक्ष्य केले. शहा यांना त्या कारवाईबद्दल आज नाहीतर उद्या उत्तर द्यावेच लागेल, असे त्यांनी म्हटले.**

उत्तरप्रदेशातील प्रयागराजमध्ये शनिवारी काँग्रेसच्या वतीने छात्रों की गुंज या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी राहुल यांनी तरूणाईशी संवाद साधला. ◀◀ पान २ वर


# 'राष्ट्रवादीला अर्थखातं मिळणार नाही, रोहित पवारांच्या दाव्याने खळबळ

## सुनेत्रा पवारांना अमित शाहांनी भेट नाकारल्याचा दावा

मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडे पुन्हा एकदा अर्थखातं सोपवलं जाणार असल्याच्या चर्चा मागील काही दिवसांपासून सुरू आहेत. मात्र, अद्याप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे अर्थखाते देण्यात आलेले नाही. याच मुद्यांवर बोलताना आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एक मोठे वक्तव्य केले आहे. 'राष्ट्रवादीला (अजित पवार) अर्थखाते मिळण्याची शक्यता कमी आहे', असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या गोटात खळबळ उडाली आहे.**

''केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे नुकतेच मुंबईत आले होते. मात्र, अमित शाह यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट नाकारली.



त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला एवढे महत्वाचे खाते (अर्थखाते) मिळेल असे वाटत नाही. खरे तर अर्थखात्याचा हक्क हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा आहे'', असे रोहित पवार यांनी म्हटले आहे. ''अजित पवार नसताना आता हळूहळू राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची ताकद कमी करण्याचा प्रयत्न भारतीय जनता पक्ष करत आहे. हे आम्ही याआधीही अनेकदा ◀◀ पान २ वर

# एफडीआयची सगळीकडे नजर

## तडजोड खपवून घेणार नाही–तुकाराम मुंढे

पुणे । प्रतिनिधी

खाद्यपदार्थांप्रमाणेच मद्य आणि मद्यार्क नसलेल्या पेयांमध्ये भेसळीच्या तक्रारी वाढल्या असून, गावठी दारूमध्ये विषारी रसायन मिसळल्याने मृत्यू झाल्याच्या घटना पुण्यात घडल्या आहेत. पेयजलांची गुणवत्ता, त्याचे उत्पादन आणि लेबलिंग, यावर आमचे बारकाईने लक्ष आहे. दूध, पनीर, खाद्यतेलांप्रमाणेच अल्कोहोलिक आणि नॉन–अल्कोहोलिक पेयांचीही तपासणी करणार असून,



कोणतीही तडजोड खपवून घेणार नाही, असा इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला.

◀◀ पान २ वर

# झारखंडमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन चिघळणार

## सरकारने परीक्षा रद्दची मागणी फेटाळली विद्यार्थ्यांचा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

रांची । वृत्तसंस्था

आंदोलक विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा केल्यानंतर झारखंड सरकारने परीक्षा रद्द करण्याची मागणी फेटाळून लावली आहे. ही परीक्षा न्यायालयाच्या आदेशानुसार घेण्यात आली असून, यशस्वी उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे, असे स्पष्टीकरण सरकारने दिले आहे. या निर्णयामुळे असंतोष पसरला असून विद्यार्थ्यांनी आपले आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. तसेच संपूर्ण प्रकरणाची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात यावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

झारखंडचे मंत्री सुदिव्य कुमार सोनू



यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या सूचनेनुसार सरकारने विद्यार्थ्यांच्या ९८ टक्के मागण्या मान्य केल्या आहेत. झारखंड लोकसेवा आयोग परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी सरकारने द्विसूत्री मार्ग स्वीकारला आहे. गुन्हेगारी बाजूंचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग करेल, तर बेकायदेशीर ◀◀ पान २ वर

# महाडीबीटी पोर्टल ९० दिवसांपासून ठप्प

## हजारो लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी महत्त्वाचे असलेले महाडीबीटी पोर्टल मागील तब्बल ९० दिवसांपासून तांत्रिक कारणांमुळे ठप्प असल्याने विद्यार्थी, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, विधवा, निराधारांसह हजारो लाभार्थ्यांची कामे रखडली आहेत. महाडीबीटी २.० चे अपग्रेडेशन सुरू असल्याचे सांगण्यात येत असले, तरी अद्याप सेवा पूर्णपणे पूर्ववत झालेल्या नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**

राज्य शासनाने १ ते १५ जूनदरम्यान महाडीबीटी पोर्टल बंद राहणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर ३० जूनपर्यंत, तर पुढे १५ जुलैपर्यंत सेवा सुरू होईल,




असे सांगण्यात आले. मात्र, ऑगस्ट महिना सुरू होऊनही पोर्टलवरील तांत्रिक अडचणी कायम असल्याने अर्ज प्रक्रिया, पडताळणी, मंजुरी तसेच अनुदान वितरणाची कामे मोठ्या प्रमाणात रखडली आहेत. महाडीबीटीच्या तांत्रिक अडचणींचा सर्वाधिक ◀◀ पान २ वर

### ७२ शासकीय योजनांवर परिणाम

महाडीबीटी पोर्टलच्या तांत्रिक अडचणींमुळे मॅट्रिकोत्तरच्या ५४, मॅट्रिकपूर्वच्या १५ आणि इतर अशा एकूण ७२ शासकीय योजनांवर परिणाम झाल्याचे सांगण्यात येत आहे. यामध्ये हयात प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती व फी माफी, संजय गांधी निराधार, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन, मुख्यमंत्री वयोश्री, शेतकरी अनुदान यांसह विविध योजनांचा समावेश आहे.ङ्गअर्ज सादर करण्यापासून ते पडताळणी, मंजुरी आणि अनुदान वितरणापर्यंतच्या प्रक्रियेला या तांत्रिक अडथळ्यांचा फटका बसला आहे. त्यामुळे पोर्टल तातडीने पूर्ववत करून प्रलंबित अर्ज आणि लाभार्थ्यांची कामे मार्गी लावावीत, अशी मागणी होत आहे.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६


## थोडक्यात

### आरण येथील पांडुरंग पालखी सोहळ्यास उपस्थित रहा – कोरडे

माजलगाव । प्रतिनिधी



तीर्थक्षेत्र आरण येथे येत असलेल्या पंढरपूर येथील पांडुरंग पालखी सोहळ्यास राज्यातील तमाम भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन एकता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे यांनी केले आहे.

आरण येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी श्री क्षेत्र पंढरपूर येथून पांडुरंगाची पालखी आरणला जात असते. यावर्षीही ही पालखी सोहळा अरण येथे जात असून दि. ८ ऑगस्ट रोजी पांडुरंगाच्या पालखीचे पंढरपूर येथून प्रस्थान होणार आहे. त्यानंतर दि. ९ ऑगस्ट रोजी या मार्गातील आष्टी येथे पालखीचा मुक्काम होईल. यानंतर दि. १० ऑगस्ट रोजी आरण येथे पालखीचा मुक्काम होईल. दि. ११ ऑगस्ट रोजी श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचा संजीवनी समाधी सोहळा होईल व दि. १२ ऑगस्ट रोजी काल्याचे किर्तन आणि त्यानंतर श्रीफळ हंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या कार्यक्रमास राज्यातील सावता महाराज यांच्या भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन एकता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे यांनी केले आहे.

### सामाजिक कार्यकर्ते अनिल राधे कांबळे यांना समाजरत्न पुरस्कार



### तृप्ती देसाई यांच्या हस्ते झाला सन्मान

माजलगाव । प्रतिनिधी

विविध सामाजिक उपक्रमांत सातत्याने योगदान देणारे सामाजिक कार्यकर्ते अनिल राधे कांबळे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत 'मराठी पुरस्कार सोहळा २०२६' अंतर्गत सन्मान सोहळ्यात गोमाता फाउंडेशनच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांच्या हस्ते पुणे येथे समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन कार्यरत असलेल्या मातोश्री द्रोपदा बबन पठारे चॅरिटेबल ट्रस्ट, छत्रपती शेतकरी सेना, मानवता हाच एक धर्म (एनजीओ), कोकण फर्स्ट लाईट फाउंडेशन, बहुजन भूमी संघटना संचलित, मानव हक्क, माहिती अधिकार, दक्ष पोलिस मित्र पत्रकार सहकार सेना यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व स्वातंत्र्य दिनानिमित्त दि. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी पुणे येथे ब्रह्मगावचे उपसरपंच तसेच सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळख मिळवलेले नेहमीच विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले अनिल राधे कांबळे यांचा बहुजन भूमी संघटनेचे अध्यक्ष कैलास पठारे व सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्या हस्ते पुरस्कार देत गौरव करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# विजेचा शॉक लागून केसापुरी येथील तरुण कामगाराचा मृत्यू

## माजलगाव शहरातील बायपास रोडवरची घटना, सहाय्यक अभियंता, लाईनमनसह कॉन्ट्रॅक्टर व सुपरवायझर विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बायपास रोडवर डीपी बसविण्याचे काम सुरू असताना अचानक वीजप्रवाह सुरू झाल्याने विजेचा जोरदार धक्का बसून ३२ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि ०९ ऑगस्ट रविवार रोजी दुपारी २:०० वाजण्याच्या सुमारास घडली. आवेज पाशा देशमुख (३० वर्षे ) असे मृत कामगाराचे नाव असून ते केसापुरी येथील रहिवासी आहेत.या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात वीज मंडळाच्या सहाय्यक अभियंत्यासह संबंधित लाईनमन,वीज कामाचे कॉन्ट्रॅक्टर धैर्यशील भागवत ठोंबरे आणि त्यांचे सुपरवायझर दयानंद नामदेव कांबळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव शहरातील बायपास रोडवर चाऊस यांच्या तबेल्या पासुन काही अंतरावर डीपी बसविण्याचे काम कॉन्ट्रॅक्टर धैर्यशील भागवत ठोंबरे यांना मिळाले होते.दि ०९ ऑगस्ट रविवार रोजी दुपारी २:०० वाजण्याच्या सुमारास चार मजूर हे काम करीत होते.डीपी बसविण्याच्या कामासाठी कॉन्ट्रॅक्टरचे सुपरवायझर दयानंद नामदेव कांबळे



यांनी विज वितरण कार्यालयाकडुन दुपारी ४:०० वाजेपर्यंतचे परमिट घेतल्याचे सांगितले होते. त्यानंतर काम सुरू असताना दुपारी२:०० वाजण्याच्या सुमारास अचानक विजेचा प्रवाह सुरू झाला. यावेळी काम करीत असलेले शेख आवेज पाशा देशमुख यांना जोरदार विजेचा धक्का बसला. त्यानंतर ते खाली कोसळले.या दुर्दैवी दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला. घटना घडताच परिसरात खळबळ उडाली. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.दरम्यान,मृताच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून सायंकाळी उशिरा माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये वीज मंडळाचे सहाय्यक अभियंता, संबंधित भागातील लाईनमन, कॉन्ट्रॅक्टर धैर्यशील भागवत ठोंबरे आणि सुपरवायझर दयानंद नामदेव कांबळे यांना आरोपी करण्यात आले आहे. आवेज देशमुख यांच्या पश्चात पत्नी,तीन अपत्ये, आई आणि दोन भाऊ असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा अचानक मृत्यू झाल्याने केसापुरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## हर घर तिरंगा अभियानास तिरंगा रॅलीने सुरुवात





बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व विविध जिल्हा क्रीडा संघटना, बीड यांच्या संयूक्त विद्यमाने आज रविवारी रोजी हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे तिरंगा रॅलीचे आयोजन करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर यांनी दिली.

दि. ९ ते १५ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या घर हर तिरंगा अभियानांतर्गत रविवारी रॅलीला जिल्हयातील विविध क्रीडा संघटना , प्रशिक्षक व विविध क्रीडा प्रकारातील अनेक नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला. सदर तिरंगा रॅलीला शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी श्री. जे. पी. शेळके , जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर , तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय श्री. विनोद रणवरे , तायक्वाँदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. श्री. अविनाश बारगजे , जेष्ठ क्रिकेट प्रशिक्षक श्री.शेख अझहर, श्री. निसार तांबोळी ,कराटे प्रशिक्षक श्री. उत्तरेश्वर सपाटे , फुटबॉल प्रशिक्षक श्री. अफरोझ शेख, स्केटींग प्रशिक्षक श्री. वैभव गिरी, श्री. मोहसिन शेख , श्री. ऋत्वीक तांदळे, आदींच्या प्रमुख उपस्थित वंदे मातरम् गीत गायनाने सुरवात झाली. सदर तिरंगा रॅलीत तायक्वाँदो, क्रिकेट, सॉफ्टबॉल, बेसबॉल, थलेटिक्स्, फुटबॉल, स्केटींग, कराटे, बॉक्सींग, बॅडमिंटन आदी विविध खेळांच्या खेळाडूंने बहुसंख्येने सहभाग नोंदविला. रॅलीदरम्यान सहभागी खेळाडू, विद्यार्थी, नागरिक यांनी भारत माता की जय वंदे मातरम् चे नारे दिले.तिरंगा रॅलीचे आयोजन यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक, मयुर पाठक, श्री. दिनकर चर्क्रे यांनी विशेष परिश्रम घेतले, या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. ज्ञानेश्वर कोटुळे यांनी केले.

पान ६ वरुन...

### जिल्ह्याचे पालक अधिकारी

कार्यालयात बोलावून घेऊन त्यांनी या ठिकाणी विलास घुले याला न्याय मिळेल अशी ग्वाही दिली. मात्र ही ग्वाही उपोषण स्थळी दिली असती तर ते अधिक न्यायिक राहिले असते.मात्र तसे झाले नाही आज पाचवा दिवस उपोषणाचा असल्याने विलास घुले यांचा भाऊ रमेश घुले याची प्रकृती ढासळली आहे. त्याची पत्नी पाच महिन्याची गरोदर असतानाही या ठिकाणी उपोषण करत आहे. उद्या या महिलेच्या बाळाला काही झाले तर याला जबाबदार कोण राहणार? असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. जिल्ह्याचे पालक जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक यांनी या ठिकाणी भेट देऊन या कुटुंबीयांची समजूत काढली तर कदाचित हे उपोषण सुटले असते. माणूस म्हणून तरी किमान या ठिकाणी येऊन भेटायला हवे होते. मात्र तसे झाले नाही. त्यामुळे हे उपोषण चालूच आहे. एका सर्वसामान्य कुटुंब कुटुंबाची घरातला कर्ता पुरुष गेल्यानंतर काय वाताहत होते? हे त्या कुटुंबीयांनाच माहीत असते. ही बाब संवेदनशील असल्याने प्रशासनाने ही आपल्या संवेदनांना जागृत ठेवून या कुटुंबीयांचे उपोषण सोडणे गरजेचे होते. मात्र प्रशासकीय अधिकाऱ्यांना याचे काही सोयरसुतक नाही असेच यावरून दिसते. किमान जिल्ह्याच्या पालक वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तरी जिल्ह्यातील जनतेची जबाबदारी घेऊन या कुटुंबीयांची भेट घेणे गरजेचे होते. मात्र वरिष्ठ अधिकारी एवढे असंवेदनशील कसे झाले? जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना सर्व जिल्हा एक न्यायिक अधिकारी, सर्वसामान्यांना न्याय देणारे अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहतात. मात्र त्यांच्याकडून अशा प्रकारचे वर्तन अपेक्षित नाही. सध्या जिल्हा असंवेदनशीलतेच्या वळणावर आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्टीकडे गांभीर्याने पाहून आणि तत्परतेने प्रश्न कसे सुटतील याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांवर आहे. त्यामुळे किमान त्यांनी जरी हा प्रश्न गांभीर्याने घेऊन त्वरित सोडवायला हवा अशी सर्वसामान्य माणसाची माफक अपेक्षा आहे.

### उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते

मधील ८ हेक्टर ८० आर व मौजे परळी येथील स.नं. ४७८ मधील २० हेक्टर आणि अतिरिक्त १३ हेक्टर अशी एकूण ४१ हेक्टर ८० आर जमीन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्र उभारणीसाठी प्रदान करण्यात आली आहे. या संदर्भातील शासन मान्यता महसूल व वन विभागाने दिली आहे.

परळीचा लौकिक वाढेल – ना. पंकजाताई मुंडे

परळीत होणाऱ्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून मराठवाड्यात एक मोठे शैक्षणिक केंद्र उभारले जाणार असून स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नवे दालन उघडणार आहे. यामुळे पशुसंवर्धन संशोधनासाठी स्वतंत्र प्रक्षेत्र निर्माण होईल. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना तसेच शेतकरी व पशुपालकांसाठी तांत्रिक व आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाची जोड असलेले हे महाविद्यालय परळी तालुक्याचे लौकिक वाढवेल. सोबतच राज्याच्या पशूवैद्यकीय क्षेत्राला देखील यामुळे नवी उभारी मिळेल असं ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

### तोहीद खान हत्याकांडातील

यावेळी बोलताना ना. समीर काझी म्हणाले की, राज्य वक्फ बोर्ड हे मुस्लिम बांधवांच्या उत्कर्षासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. समाजातील गरजू कुटुंबांना शक्य तेवढी मदत करण्याचा प्रयत्न बोर्डाच्या माध्यमातून केला जात आहे.तोहीद खान यांच्या कुटुंबीयांना यापुढेही आणखी काही मदत करता येईल का, यासाठी आपले प्रयत्न सुरू राहतील. तसेच, माणुसकीच्या भावनेतून विविध घटक व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून खान कुटुंबीयांना आणखी मदत मिळवून देता येईल का, यासाठीही पाठपुरावा सुरू असल्याचे ना.समीर काझी यांनी सांगितले.

या कार्यक्रमास के.एस.बी.एल. उद्योगसमूहाचे संचालक शकीलभाई बागवान, अतुलभाई संघानी यांच्यासह परळी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.दरम्यान, तोहीद खान यांच्या कुटुंबीयांना दिलेला शब्द पूर्ण करून प्रत्यक्ष मदत सुपूर्द केल्याबद्दल परळीतील मुस्लिम बांधवांनी ना.समीर काझी तसेच राज्य वक्फ बोर्डाचे आभार व्यक्त केले.

### परळीत १० ऑगस्टला

जातींच्या उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात राज्यभर जनजागृती आणि आंदोलनाची भूमिका रिपब्लिकन सेनेने घेतली आहे. याच पार्श्वभूमीवर ३० जून रोजी मुंबईतील आझाद मैदान ते मंत्रालय परिसरापर्यंत भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी राज्यातील अनुसूचित जातींचे अ, ब, क, ड उपवर्गीकरण होऊ देणार नाही, तसेच यापुढे राज्यातील जिल्हा आणि तालुका स्तरावर आंदोलन तीव्र करण्यात येईल, अशी भूमिका आनंदराज आंबेडकर यांनी मांडली होती. त्याच आंदोलनाच्या पुढील टप्प्याचा भाग म्हणून परळी येथे महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चाच्या माध्यमातून अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात जनजागृती करण्यात येणार असून, सामाजिक न्यायाच्या प्रश्नावर आंबेडकरी समाजाची एकजूट दाखविण्याचा निर्धार व्यक्त केला जाणार आहे. मराठवाड्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने समाजबांधव परळीत दाखल होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### जिल्हा परिषद माध्यमिक शाळा

वाघे बाबुळगाव चे मुख्याध्यापक श्री हरिदास धनगर शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे जेष्ठ शिक्षक सुभाष काकड महारुद्र झोडगे शालेय व्यवस्थापन सदस्य सुधीर चौधरी, नंदू आबा जोगदंड, बाबासाहेब बोबडे, विष्णू कळसे, प्रमोद नाईकवाडे, अमोल भिलारे,श्रीमती सुनंदा अतुल शिंदे, लहू नाईकवाडे ,श्रीराम नाईक हे उपस्थित होते मंचावरील प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर काही प्रतिनिधिक स्वरूपात माता पालक व पुरुष पालक यांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर शाळेमध्ये चालणाऱ्या विविध उपक्रम विविध शिष्यवृत्ती योजना विषयी माहितीशाळेतील शिक्षक सुग्रीव तांदळे उद्धव घोडके यांनी उपस्थित पालकांना माहिती दिली, प्रस्ताविक भाषणात श्री सुभाष काकड यांनी विद्यार्थ्यांची शिस्त अभ्यासातील प्रगती तसेच शालेय प्रगती काही उनिवा यांचे सविस्तर असे मांडणी उपस्थित पालकांसमोर केली व पालक व शाळा यांनी समन्वयाने काही बदल असेल तो करावा असे मत व्यक्त केले.

## खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते पीएसआय सोमनाथ भुसारी यांचा जाहीर सत्कार

युसूफवडगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील श्री. सोमनाथ भुसारी यांना पोलीस खात्यात पीएसआय (पोलीस उपनिरीक्षक) पदावर पदोन्नती मिळाल्याबद्दल बीड जिल्ह्याचे खासदार श्री. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.



श्री. सोमनाथ भुसारी हे गेल्या ३३ वर्षांपासून पोलीस दलात कार्यरत असून सध्या अंबाजोगाई येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक कार्यालयात सेवा बजावत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय सेवेला मिळालेल्या या पदोन्नतीनिमित्त कुटुंबीय व मित्रपरिवाराच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार बजरंग सोनवणे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते श्री. भुसारी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार सोनवणे यांनी श्री. भुसारी यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. या सत्कार समारंभास श्रीमंत खरबड, अशोक मोडवे, महारूद्र लामतुरे, किरण सातपुते, सरपंच मुकूंद कणसे, दादासाहेब गायकवाड, राजाभाऊ खरबड, वैजनाथ थळकरी, सचिन जावळे, बाळासाहेब निशिगंध, शहाजी शिंदे, अनिल निकम, महादेव मोडवे, अशोक चोपणे, दत्ता निकम, ओम लामतुरे यांच्यासह गावकरी, मित्रपरिवार व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी शुभम टाक



बीड । प्रतिनिधी

सोनार समाजाचे आराध्य दैवत श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी शुभम नागनाथ टाक, उपाध्यक्षपदी विनोद रामदास दहिवाळ तर सचिवपदी अनिल भिमराव बागडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची जयंती श्रावण शुद्ध नवमी या तिथीनुसार दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी साजरी करण्यात येणार आहे. या संदर्भात श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक तथा प्रणेते ड. संदीप बेदरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी नगरसेवक तथा बीड सराफा असोसिएशनचे अध्यक्ष रवीशेठ मानूरकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच गणेशराव नांदेवालीकर, शशिकांत शहाणे, सतीश महामुनी यांच्या उपस्थितीत श्री दत्त मंदिर येथे नुकतीच बैठक संपन्न झाली आहे. या बैठकीत श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी शुभम नागनाथ टाक, उपाध्यक्षपदी विनोद रामदास दहिवाळ, सचिवपदी अनिल भिमराव बागडे, कोषाध्यक्षपदी अक्षय रमेश बुरांडे कार्याध्यक्षपदी वैभव हिम्मतराव बेदरे संघटकपदी निलेश नरेंद्र करमाळकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. यावेळीश्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवानिमित्त भव्य रॅली व सामाजिक धार्मिक कार्यक्रमा संदर्भात चर्चा करण्यात आली. बैठकीस संकेत बेदरे, पुष्कराज बेदरे, ओम करमाळकर, स्वस्तिक अंबिलवादे, सौरभ बेदरे, अरुण लोळगे, प्रणव कुलथे, राजू शहाणे, बाळू बेदरे, आर्यन जोजारे, ज्ञानेश्वर क्षीरसागर, अनिल बागडे, कैलास वडगावकर, विनोद अष्टेकर, विशाल करमाळकर, अनिल टाक, राजू कुलथे, स्वयम पंडित, मुन्नाशेठ दहिवाळ, विशाल जोजारे, मनोज दहिवाळ, अतुल बागडे, राजेश अडाणे, सतीश कुलथे, लक्ष्मण बेदरे, अक्षय बुरांडे, गणेश जोजारे, रोहन बेदरे, कार्तिक टाक, अनिल महामुनी, दत्तात्रय सोनार, सोनल करमाळकर, कृष्णा शहाणे, शशिकांत शहाणे, तन्मय पंडित यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जय जवान माध्यमिक विद्यालयात 'ऑगस्ट क्रांती दिन' आणि 'जागतिक आदिवासी दिन' उत्साहात साजरा; क्रांतिकारकांना आणि निसर्गरक्षकांना वंदन

वडवणी । प्रतिनिधी

अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित, जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव ता.वडवणी जी.बीड या विद्यालयात ९ ऑगस्ट रोजी 'ऑगस्ट क्रांती दिन' आणि 'जागतिक आदिवासी दिन' अत्यंत उत्साही आणि भारावलेल्या वातावरणात साजरा करण्यात आला. एकाच दिवशी आलेल्या या दोन्ही महत्त्वपूर्ण दिनांचे औचित्य साधून विद्यालयात विविध देशभक्तीपर आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात आदरणीय मुख्याध्यापक/प्राचार्य श्री.सारोक्ते डी .जी. व सर्व शिक्षकवृंद आणि प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत झाली. राष्ट्रपिता महात्मा गांधी, क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा, आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे आणि स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सर्वांनी सामूहिक राष्ट्रगीत आणि राज्यगीत म्हटले. 'ऑगस्ट क्रांती दिना'चे महत्त्व सांगताना विद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'भारत छोडो' आंदोलन आणि महात्मा गांधींच्या करेंगे या मरेंगे या ऐतिहासिक नाऱ्याचा इतिहास भाषणांतून मांडला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बलसागर भारत होवो या देशभक्तीपर समूहागीताने व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्ती गीतातून संपूर्ण वातावरण राष्ट्रभक्तीने प्रफुल्लित झाले.तसेच विद्यालयातील सह-शिक्षक टाळे सर ,घाडगे सर यांनीही आपल्या मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच विद्यालय चे प्राचार्य यांनी याप्रसंगी बोलताना सर्व उपस्थितांना विद्यार्थ्यांना संबोधित केले. ते म्हणाले, ९ ऑगस्ट हा दिवस आपल्यासाठी दुहेरी प्रेरणेचा आहे. एकीकडे हा दिवस आपल्याला देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांची आठवण करून देतो, तर दुसरीकडे निसर्गाशी कृतज्ञ राहून त्याचे रक्षण करणाऱ्या आदिवासी संस्कृतीचा सन्मान करायला शिकवतो. आजच्या तरुणांनी सुशिक्षित आणि शिस्तप्रिय नागरिक बनून देशसेवेचा आणि



पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला पाहिजे. ९ ऑगस्ट. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक सुवर्णपान! सन १९४२ मध्ये याच दिवशी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध 'भारत छोडो' आंदोलनाची हाक दिली होती. मुंबईच्या ऐतिहासिक क्रांती मैदानावरून त्यांनी देशवासीयांना करेंगे या मरेंगे हा संदेश दिला. हा केवळ एक नारा नव्हता, तर तो प्रत्येक भारतीयाच्या मनातील स्वातंत्र्याचा ध्यास होता.प्रमुख नेत्यांना अटक होऊनही देशातील सामान्य जनता, तरुण आणि महिला स्वतः या लढ्यात उतरले. जेव्हा इंग्रजांनी सर्व मोठ्या नेत्यांना अटक केली, तेव्हा वीर महिला क्रांतिकारक अरुणा असफ अली यांनी मुंबईच्या गोवालिया टँक मैदानावर पोलिसांच्या लाठ्या-काठ्यांची पर्वा न करता तिरंगा फडकवून भारत छोडो आंदोलनाचे रणशिंग फुकले होते. या आंदोलनाने दाखवून दिले की, जेव्हा एक राष्ट्र एकत्र येते, तेव्हा जगातील सर्वात मोठी शक्तीही त्यांच्यासमोर झुकते. आज आपण ज्या स्वतंत्र हवेत श्वास घेत आहोत, ती या क्रांतीच्या आणि असंख्य हुतात्म्यांच्या बलिदानाची देणगी आहे. तसेच ९ ऑगस्ट. आजचा दिवस जगभरात 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे निसर्गाच्या कुशीत राहणाऱ्या, जल-जंगल-जमिनीचे रक्षण करणाऱ्या आणि आपल्या समृद्ध संस्कृतीने भारताचे सौंदर्य वाढवणाऱ्या आपल्या आदिवासी बांधवांचा सन्मान करण्याचा दिवस आहे.आपल्या देशाच्या संस्कृतीची मुळे आदिवासी समाजात रुजलेली आहेत. हा समाज आपल्याला निसर्गाशी कृतज्ञ राहून जगण्याची सर्वात मोठी शिकवण देतो. निसर्गाचे शोषण न करता, त्याचे रक्षण करून कसे जगावे, हे आदिवासी संस्कृतीकडून शिकण्यासारखे आहे. आज जेव्हा संपूर्ण जग हवामान बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांशी लढत आहे, तेव्हा आदिवासी बांधवांचे पारंपरिक ज्ञान आणि जीवनपद्धती संपूर्ण जगाला दिशा दाखवणारी आहे.भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही आदिवासी क्रांतीवीरांचे योगदान अतुलनीय राहिले आहे. भगवान बिरसा मुंडा, तंट्या भील, राघोजी भांगरे, नाग्या कातकरी ,राया ठाकर, तिलका मांझी, वीर भागोजी नाईक,सुभेदार गोविंदराव खाडे, रामा किरवा आणि बाबुराव शेडमाके यांसारख्या अनेक महान देशभक्तांनी ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध सर्वात आधी एल्गार पुकारला होता. त्यांच्या या बलिदानाचा इतिहास आपण कधीही विसरता कामा नये. आजच्या आधुनिक काळात आपल्याला देशासाठी सीमेवर जाऊन लढण्याची गरज नाही. परंतु, एक उत्तम नागरिक बनून, शिस्त पाळून, प्रामाणिकपणे अभ्यास करून आणि देशाच्या प्रगतीत वाटा उचलून आपण ही 'देशभक्ती' जपू शकतो. आजच्या या पवित्र दिवशी आपण सर्वांनी देशाच्या एकात्मतेसाठी आणि प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याची व पर्यावरण जतन व सवर्धन करण्याची शपथ घेऊया असे आपले मनोगत व्यक्त केले. आणि शेवटी यावेळी उपस्थित सर्व पाहुणे, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून अत्यंत गंभीर वातावरणात मौन धारण केले आणि हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन केले. शेवटी सर्वांचे आभार व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता झाली.




# आता सीएनजी, पीएनजीमध्ये बायोगॅसचं मिश्रण?

## गोबरधन योजनेला मंजुरी, शेतकऱ्यांना होईल फायदा

दिल्ली : केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी (दि. ६ ऑगस्ट) बायोगॅस उत्पादनाच्या गोबरधन योजनेला मंजुरी दिली. याला भारताची राष्ट्रीय सर्क्युलर बायोएनर्जी योजना म्हणून ओळखले जाणार असून, त्यासाठी एकूण २३,७३१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. बायोगॅसचे उत्पादन वाढवणे तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याचा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

गोबरधन योजना आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०३५-३६ पर्यंत राबविण्यात येणार आहे. शेतपिकांचे अवशेष, जनावरांचे शेण, प्रेसमड, शहरातील सेंद्रिय करचरा व इतर बायोमासचे रुपांतर स्वच्छ इंधन, सेंद्रिय खत आणि ग्रामीण भागातील उत्पन्नामध्ये करणे आणि यामाध्यमातून कॉम्प्रेस्ड बायोगॅसला भारताच्या ऊर्जा मिश्रणाचा एक महत्त्वाचा आधार म्हणून विकसित करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. ही योजना पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाकडून राबवली जाईल. या योजनेअंतर्गत, सरकारकडून कॉम्प्रेस्ड बायोगॅस दर



प्रति एमएमबीटीयू २,११० रुपये निश्चित करण्यात आला आहे. यामुळे उत्पादकांना दीर्घकाळ स्थिर उत्पन्नाची खात्री मिळेल. तसेच ग्राहकांना गॅस परवडणाऱ्या दरात मिळेल, असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. जसे पेट्रोल इथेनॉल, तसेच आता नव्या योजनेअंतर्गत, आर्थिक वर्ष २०२७ पासून सीएनजी आणि पीएनजीमध्ये ३ टक्के बायोगॅस मिश्रणास सुरुवात होईल. हे प्रमाण २०२८ मध्ये ४ टक्के आणि २०२९ पासून पुढे ५ टक्के असे निश्चित करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना फायदा होईल- पंतप्रधान मोदी

केंद्रीय मंत्रिमंडळाने गोबरधन योजनेला मंजुरी दिली आहे, यामुळे देशांतर्गत कॉम्प्रेस्ड बायोगॅस उत्पादनाला मोठी चालना मिळेल.

या योजनेचा आपल्या देशातील शेतकरी, सहकारी संस्था, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग, महिला उद्योजक आणि ग्रामीण उद्योगांना फायदा होईल, तसेच ऊर्जा सुरक्षेला बळकटी मिळेल तसेच आयात जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल.

तसेच वैज्ञानिक पद्धतीने कचरा व्यवस्थापनाला प्रोत्साहन मिळेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.।




### महत्वाच्या घटना

१६७५ : चार्ल्स (दुसरा) याने ग्रीनीच येथील जगप्रसिद्ध वेधशाळेचा शिलान्यास केला.
१८१० : 'स्मिथसोनियन इन्स्टिट्युशन' ची स्थापना झाली.
१८२१ : मिसुरी हे अमेरिकेचे २४ वे राज्य बनले.
१९८८ : दुसर्या महायुद्धात बेकायदेशीरपणे बंदिवासात टाकलेल्या किंवा हद्दपार केलेल्या जपानी वंशाच्या अमेरिकन नागरिकांना राष्ट्रपती रोनाल्ड रेगन यांनी प्रत्येकी २०,००० डॉलर भरपाई देण्याचे कबूल केले.
१९९० : मॅगेलान हे अंतराळयान शुक्रावर पोचले.
१९९९ : औषधांच्या दुकानांत विकल्या जाणार्या औषधांत प्राणिज पदार्थ असल्यास त्याचा उल्लेख वेष्टणावर करणे अनिवार्य असल्याचा केंद्रसरकारच्या सामाजिक न्याय खात्याचा निर्णय. सामिष
१९९९ : 'इंडियन फिजिक्स असोसिएशन' तर्फे देण्यात येणारा 'डॉ. मो. वा. चिपळोणकर स्मृती पुरस्कार' डॉ. निवास पाटील व डॉ. प्रकाश तुपे यांना जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५५ : नारायणराव पेशवा ५ वा पेशवा (मृत्यू: ३० ऑगस्ट १७७३)
१८५५ : 'गान सम्राट' उस्ताद अल्लादियाँ खाँ जयपूर -अत्रौली घराण्याचे संस्थापक व कोल्हापूर दरबारचे प्रसिद्ध गायक (मृत्यू: १६ मार्च १९४६)
१८६० : पं. विष्णू नारायण भातखंडे संगीतशास्त्रकार, हिन्दुस्थानी संगीताचे प्रसारक, संशोधक व गांधर्व महाविद्यालयाचे एक संस्थापक (मृत्यू: १९ सप्टेंबर १९३६)
१८७४ : हर्बर्ट हूव्हर अमेरिकेचे ३१ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २० आक्टोबर १९६४)
१८९४ : व्ही. व्ही. गिरी भारताचे चौथे राष्ट्रपती, लोकसभा सदस्य आणि केंद्रीय मंत्री (मृत्यू: २३ जून १९८०)
१९०२ : नॉर्मा शिअरर कॅनेडियन अमेरिकन अभिनेत्री (मृत्यू: १२ जून १९८३)
१९१३ : डॉ. अमृत माधव घाटगे संस्कृत व प्राकृत विद्वान (मृत्यू: ८ मे २००३)
१९६० : देवांग मेहता भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक अग्रणी व्यक्तिमत्त्व आणि नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनीज चे अध्यक्ष (मृत्यू: १२ जुलै २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४२ : हुतात्मा शिरीषकुमार (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९५० : खेमचंद प्रकाश संगीतकार (जन्म: १२ डिसेंबर १९०७)
१९८० : जनरल ह्याह्याखान पाकिस्तानचे ३ रे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ४ फेब्रुवारी १९१७)
१९८२ : मनाली कल्लट तथा एम. के. वैणू बाप्पा भारतीय खगोलशास्त्रज्ञ. तार्यांची प्रत आणि त्यांच्या वर्णपटातील परस्परसंबंधांची उकल केली. (जन्म: १० एप्रिल १९२७)
१९८६ : जनरल अरुणकुमार वैद्य यांची अतिरेक्यांनी पुणे येथे हत्या केली. १९६५ आणि १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धात अतुलनीय शौर्य गाजवल्याबद्दल त्यांना 'महावीरचक्र' मिळाले होते. त्यांच्या लष्करप्रमुखपदाच्या काळातच 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'ची कारवाई झाली होती. (जन्म: २७ जानेवारी १९२६)
१९९२ : लेफ्टनंट जनरल शंकरराव पांडुरंगराव (पाटील) तथा एस. पी. पी. थोरात यांचे निधन. संयुक्त राष्ट्रसंघाने शांतता प्रस्थापनेसाठी कोरियात पाठवलेल्या शांतिसेनेचे ते सेनापती होते. कीर्तिचक्र, पद्मश्री, सावरकर पुरस्कार असे अनेक मानसन्मान त्यांना मिळाले होते. (जन्म: १२ ऑगस्ट १९०६)
१९९७ : नारायण पेडणेकर कवी व नाट्यसमीक्षक (जन्म:)
२०१२ : सुरेश दलाल साहित्य अकादमी पुरस्कार विजेते गुजराथी कवी, लेखक आणि संपादक (जन्म: ११ आक्टोबर १९३२)

## मिरचीवरील चुरडा मूरडा रोगाचे व्यवस्थापन

मिरची पिकावर चुरडा मुरडा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. हा एक विषाणूजन्य रोग असुन त्यामुळे पानावर पिवळसर व हिरव्या रंगाचे डाग पडतात व पाने बारिक व वेडीवाकडी होतात अशा पानाचा गुच्छा तयार होऊन रोगट फांदीला झुपक्याचा आकार येतो. नविन फुटीचे छोटया पानात रूपांतर होऊन गुच्छा सारखे दिसतात व झाडाची वाढ पुर्णपणे खुंटते व उत्पादनात ४० ते ५० टक्क्या पर्यंत नुकसान होऊ शकते. या रोगाचा प्रसार रस शोषण करणाऱ्या किडीमुळे होतो म्हणुन मिर्ची पिकावर येणाऱ्या मावा, फुलकिडे, पांढरी माशी व कोळी या किडींबद्दल माहिती व व्यवस्थापनाचे उपाय करणे गरजेचे आहे.

मावा : हि किड काळया किंवा पोपटी रंगाची असते. हया किडींची पिल्ले पंख विरहीत तसेच प्रौढ पंखासहित आढळतात. किड शेंडयावर पानावर खालच्या बाजूस राहून पानातील रस शोषूण घेते त्यामुळे झाडाची वाढ खुंटते व पाने निस्तेज दिसतात. तसेच हि किड आपल्या शरीरातून चिकट द्रव्य बाहेर सोडते त्यावर उष्ण व दमट हवामानात काळया रंगाची बुरशी वाढुन प्रकाश संश्लेषन कियेत अडथळा निर्माण होते, अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेत बाधा निर्माण होऊन झाडाची वाढ खुंटते. या किडीची जिवन चक १० ते १२ दिवसात पुर्ण होते व एका वर्षात १२ ते १४ पिढया सहज पुर्ण होतात.

पांढरी माशी : पांढऱ्या माशीचे शरीर पिवळे व पंख पांढरे असतात, ती पानातून व फुलातून रस शोषन करून नुकसान पोहचविते. वाढलेले तापमान व आर्दता या किडीच्या वाढीस पोषक आहे. या किडीचे जिवनचक २५ते ३५ दिवसात पूर्ण होते तर वर्षाभरात ९ ते १० पिढया पूर्ण होतात.

फुलकिडे : हि किड अतिशय सुक्ष्म असुन तिचे शरीर लांबट आकारचे असते. किड पानावर तसेच फळावर पेशी खरबडून त्यातुन निघालेला रस शोषुन घेते त्यामुळे पाने वेडीवाकडी होतात तर फळावर खरबडल्यासारखे चट्टे दिसतात झाडाची वाढ थांबुन पाने व कळयाची गळ होते.

कोळी : हि अष्टपाद वर्गातील किड असुन आकाराने अतिशय सुक्ष्म असते. पिवळसर रंगाचे कोळी पानावर राहून रस शोषुन घेतात. प्रादुर्भाव ग्रस्त झाडाची पाने खालच्या दिशेने वाकडी होतात. जास्त प्रादुर्भाव असल्यास झाडाची वाढ खुंटते तसेच फुले व कळया गळण्याचे प्रमाण वाढते.व्यवस्थापन : पेरणीपूर्वी गादीवाफ्याला पाणी देऊन ०.४५ मिमि जाड प्लास्टिकच्या शिटने तिन आठवडे झाकुन ठेवावे. त्यामुळे उष्णतेने मातीचे निरजंतूकरण होते व मातीमधील हानीकारक बुरशी तसेच किडीची नायनाट होतो. पांढऱ्या माशीच्या व्यवस्थानासाठी पिवळया रंगाचे तर फुलकिडयासाठी निळया रंगाचे चिकट सापळे लावावेत. शेताच्या चहूबाजुनी मका, चवळी व झेंडू च्या तिन ओळी लावाव्या या पिकांवर क्रायसोपा, लेडी बर्ड बिटल इत्यादी परभक्षी किटकाची वाढ होऊन रस शोषण करणाऱ्या किडींच्या नियंत्रणास मदत होते.

## भुईमूग पिवळा पडण्याची समस्या व उपाययोजना

भुईमूग पिकात पिवळेपणा दिसू लागल्यास तो अनेक कारणांमुळे होऊ शकतो. विशेषतः जर पाऊस सतत होत असेल आणि जमीन चुनखडी (कॅल्सियमयुक्त) असेल, तर पिकाच्या आरोग्यावर त्याचा थेट परिणाम होतो. खाली या समस्येचं विश्लेषण व उपाय दिले आहेत.

समस्या ओळख : पाने पिवळी होणे ही लक्षणे प्रामुख्याने सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे (विशेषतः लोह, मॅग्नेशियम, मोलिब्डेनम दिसून येतात.

पाऊस आणि चुनखडी जमिन : सततच्या पावसामुळे मुळांना ऑक्सिजन मिळत नाही. चुनखडी जमिनीत जास्त असल्याने लोह व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषली जात नाहीत. मुळांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.सूक्ष्म अन्नद्रव्ये फवारणी : पाने पिवळी पडल्यास खालील मिश्रणाचा फवारणीद्वारे उपयोग करा.

फेरस सल्फेट ०.५% (५०० ग्रॅम/१०० लिटर पाणी). सायट्रिक ॲसिड ५० ग्रॅम/१०० लिटर पाणी. युरिया १% (१ किलो/१०० लिटर पाणी) (वाढीला चालना देण्यासाठी). हे मिश्रण ७-१० दिवसांच्या अंतराने २ वेळा फवारावे.

पाणी निचरा सुधारणा : सततचा पाऊस असल्यामुळे जमिनीत पाणी साचत असल्यास, पिकामध्ये पाणी साचणार नाही याची दक्षता घ्या. नाली पद्धतीने पाणी वाहून नेण्याची सोय करावी.जमिनीचा पीएच नियंत्रित करणे : जमिनीचा पीएच ७.५ पेक्षा जास्त असल्यास सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषले जात नाहीत. अशावेळी



सेंद्रिय घटक (जसे कंपोस्ट, गांडूळ खत) टाकल्यास जमिनीचा काही प्रमाणात संतुलित होतो. झिंक, फेरस आणि मॅग्नेशियमसारखी सूक्ष्म अन्नद्रव्ये पाने फवारणीने द्यावीत.

जमिनीची तपासणी : एकदा मृदा परीक्षण करून घ्या. त्यामुळे नेमकी कोणती अन्नद्रव्ये कमी आहेत हे समजेल.

जैविक उपाय : रायझोबियम व पीएसबी कल्चर यांचे बीजप्रक्रिया केल्यास मुळांच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो. ट्रायकोडर्मा + जीवामृत/जिवाणू खते वापरल्यास मुळांची वाढ सुधारते.


भुईमूग पिकात पिवळेपणा दिसल्यास तो केवळ अन्नद्रव्यांच्या कमतरतेचा नाही, तर जमिनीचा प्रकार, हवामान व पाण्याचा निचरा या सर्व गोष्टींचा मिळून परिणाम असतो. योग्य अन्नद्रव्य फवारणी, निचरा व जैविक उपाययोजना करून आपण भुईमूग पीक निरोगी ठेवू शकतो.

## कापूस पिकातील बोंड अळी नियंत्रण

कापूस पिकातील गुलाबी बोंडअळी नेमकी काय आहे, तिचा प्रादुर्भाव कशामुळे होतो, तिचा प्रसार कसा होतो, तिची लक्षणे काय आहे आणि बोंड अळीच्या रासायनिक नियंत्रणासाठी काय उपाय योजना आहेत याबद्दल सविस्तर माहिती असल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते. कपाशीवर मावा, तुडतुडे, फुलकिडे, बोंडअळी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी २००२ मध्ये बीटी जनुक असलेल्या वाणांचा वापर भारतामध्ये सुरू झाला परंतु बोंड अळीचा प्रादुर्भाव बीटी कपाशीवर सुद्धा दिसून येत आहे. शेतकरी मित्रांनी वेळेवर उपाययोजना केल्यास बोंड अळीचा प्रादुर्भाव पासून होणारे संभाव्य नुकसान कमी करता येईल. कापूस पिकात मुख्य ठिपक्याची बोंड आळी, अमेरिकन (हिरवी) बोंडअळी ,गुलाबी बोंड आळी या तीन बोंड अळ्यांचा प्रादुर्भाव असतो.

बोंड अळीचा प्रकार : ठिपक्याची बोंड अळी - ३० ते ६५ दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी) अमेरिकन बोंड अळी - ४५ ते ८५ दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी) रोटरी गुलाबी बोंड अळी - ७५ ते ११० दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी)

जीवनक्रम व ओळख : अंडी आकाराने चपटी व १ मि.मी. लांब असून रंगाने मोत्यासारखी चकचकीत पांढरी असतात व ती फुले, बोंड, देठ व कोवळ्या पानांच्या खालील बाजूस दिसून येतात. अंडी अवस्था सुमारे ३ ते ५ दिवस राहते व या पक्व झालेल्या अंड्यातून सफेद रंगाची १ मिमी. लांब व डोके



तपकिरी असलेली अळी बाहेर पडते. पूर्ण वाढ झालेली अळी सुमारे ११ ते १३ मि.मी. लांबट असून प्रत्येक वलयावर गुलाबी पट्टा असतो व तो नंतर शरिरावर पसरतो त्याने अळीचे शरीरगुलाबी दिसते. अळी अवस्था सुमारे ८ ते २१ दिवसांच्या दरम्यान असते. कोषावस्था मध्ये अळी लालसर तपकिरी रंगाची दिसते व सुमारे ८ ते १० मि.मी. लांब असते. तसेच कोषावस्था सुमारे ६ ते २० दिवस राहते व त्यातून पतंग बाहेर येतात. पतंगाची लांबी सुमारे ८ ते ९ मि.मी.असते व ते करड्या रंगाचे दिसतात. पतंगाच्या पुढील पंखावर काळसर पट्टे दिसतात व पाठीमागील पंख पतंगावस्था सुमारे ५ ते ३१ दिवस राहते.

प्रादुर्भावाची कारणे : देशी जातीच्या तुलनेने अमेरिकन जातींवर जास्त प्रादुर्भाव. दीर्घकाळ वाढणाऱ्या संकरित वाणाची लागवड केल्याने बोंड अळीच्या वाढीसाठी सतत पोषक वातावरण निर्माण होते. कपाशी बरोबरच भेंडी,अंबाडी,जास्वंद,ताग इत्यादी पर्यायी खाद्याची उपलब्धता असणे. कापसाच्या विविध संकरित वाणांचा फुले येण्याचा व बोंडे लागण्याचा काळ वेगवेगळा असल्याने त्यांची लागवड केल्याने कोडीच्या वाढीसाठी सतत खाद्य पुरवठा होऊन जीवनक्रमाच्या संख्येत वाढ होणे. हंगामपूर्व तसेच हंगामी कापूस लागवड केल्याने कोडींचा जीवनक्रम वर्षभर चालू राहते. बी. टी. जनुक विरहीत कपाशीच्या ओळी न लावल्यामुळे बी. टी. प्रथिनाविरुद्ध प्रतिकारक्षमता तयार होणे. जादा उत्पादनासाठी कपाशीच्या हंगामाचा कालावधी वाढविल्याने किडीस खाद्याची उपलब्धता होणे.

पिकावर असा होतो परिणाम : अंड्यातून निघालेली अळी बोंडात शिरल्यानंतर तिच्या विष्ठेने व बोंडाच्या बारीक कणांच्या सहाय्याने छिद्र बंद करते. ज्या मुळे बोंडाचे वरुन निरीक्षण केल्यानंतर सुध्दा अळीचा प्रादुर्भाव ओळखता येत नाही. या अळीचा प्रादुर्भाव बोंडा मध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. किडलेल्या पात्या गळून पडतात किंवा अशी बोंडे परिपक्व न होता च फुटतात. गुलाबी बोंडअळी सरकीचे नुकसान करते. सरकी किडलेली असल्यामुळे बियाण्याची उगवणशक्ती कमी होते तसेच धाग्याची लांबी व मजबूतीही कमी होते.

कपाशी गुलाबी बोंड अळी नियंत्रण : प्रति एकर ८ ते १० कामगंध सापळ्यांचा वापर करावा. त्यात सापडणारी नर पतंग गोळा करून नष्ट करावेत. गरजेनुसार वेळोवेळी कामगंध सापळ्यात ल्युअर बदलून घ्यावे. कापूस साठवण केलेल्या जागी आणि जिनिंग-प्रेसिंग मिलच्या ठिकाणी प्रकाश सापळे, कामगंध सापळे लावावेत. पुढील वर्षी शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी डिसेंबर महिन्यात कपाशीच्या पऱ्हाट्या किंवा कपाशीचे शेतातील अवशेष नष्ट करावेत. त्यासाठी कापसाची शेवटची वेचणी झाल्यानंतर शेतात जनावरे चरण्यासाठी सोडून द्यावीत. उर्वरित शेंदरी बोंड अळीच्या नियंत्रणास मदत होते. डिसेंबरनंतर कपाशी पिकाचा खोडवा (फरदड) अनेक शेतकरी ठेवतात. जास्त पाणी दिल्याने कपाशीला पाते, फुले व बोंडे गुलाबी बोंड अळीच्या उपजीविकेसाठी कपाशी बोंडे उपलब्ध होत राहतात. परिणामी किडीची वाढ होत राहते. ही कीड बी. टी.ला प्रतिकारकता निर्माण करते म्हणून डिसेंबर ते १५ जानेवारीच्या आत पीक काढून टाकावे. किंवा खोडवा घेणे टाळावे. पीक काढणीनंतर कपाशीच्या पऱ्हाट्या शेतात किंवा शेताजवळ त्यांचा ढीग करून ठेऊ नये. पीक काढणीनंतर खोल नांगरणी करून जमीन उन्हात चांगली तापू द्यावी.

जैविक नियंत्रण : निम तेल १०,००० पीपीएम - २० मिली किंवा बिव्हेरिया बॅसियाना ५० मिली किंवा बॅसिल्लस थुरिंगींसिस ५० मिली प्रति १५ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

रासायनिक पद्धत : १) कराटे (लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ईसी) - १० मिली.

२) सुपर डी (क्लोरोपायरीफॉस + सायपरमेथ्रीन) - ३० मिली. ३) प्रोफेक्स सुपर (प्रोफेनोफॉस + सायपरमेथ्रीन) - ३० मिली. ४) ईएम १ (इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी) - १० मिली. ५) डेसिस १०० (डेल्टामेथ्रिन १०० ईसी) - १० मिली. ६) ट्रेसर (स्पिनोसॅड ४५ एससी.) - ७ मिली. ७) एम्पलिगो (क्लोरएन्ट्रानिलिप्रोल ०९.३०% + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ०४.६०% ) - ८ मिली.

८) कोराजन (क्लोरॅनट्रानिलीप्रोल १८.५% एस. सी) - ६ मिली. या पैकी कोणतेही कीडनाशक आलटून पालटून किडीचा प्रादुर्भाव नुसार प्रति १५ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी भाजपच्या जिल्हा कार्यालयाचे भूमिपूजन

## गोरगरीब, शेतकरी, कष्टकरीच्या न्यायासाठी हे कार्यालय समर्पित राहणार-आ.लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्षाच्या जालना जिल्हा कार्यालयाच्या नव्या भव्य इमारतीचे भूमिपूजन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि माझी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी जालना शहरात संपन्न होणार असून, यानंतर जिल्हा रेशीम कार्यालय आणि विविध शासकीय कार्यालयाचे लोकार्पण आणि ई उदघाटन होणार असल्याने या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात व्यापक नियोजन बैठक घेण्यात आली. बैठकीत कार्यक्रमाच्या सर्व विभागनिहाय तयारीचा सखोल आढावा घेण्यात आला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी कार्यक्रमस्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करत आवश्यक सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि विविध कामांचे नियोजन तपासले.**

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या भूमिपूजन सोहळ्यास राज्यभरातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे. कार्यक्रम कोणत्याही अडथळ्याविना, सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि सर्व संबंधित शासकीय विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. बैठकीनंतर भाजप नेते, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यक्रमस्थळाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी भाजप नेते



तथा माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर, भाजप ग्रामीण जालना जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, भाजप जालना शहर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, अक्षय गोरंट्याल, जिल्हा अधिकारी आशिमा मित्तल अपर जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्षाचे हे नवे जिल्हा कार्यालय केवळ पक्षाचे प्रशासकीय कार्यालय राहणार नसून ते सर्वसामान्य जनतेच्या आशा-अपेक्षांचे आणि लोकसेवेचे केंद्र ठरणार आहे. गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार, वंचित, पीडित तसेच अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी हे कार्यालय कायम कार्यरत राहील. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या लोककल्याणकारी योजना पोहोचविणे, त्यांच्या समस्या ऐकून त्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडणे आणि सर्वसामान्यांच्या हिताचे रक्षण करणे हेच या कार्यालयाचे प्रमुख उद्दिष्ट राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने नेहमीच 'अंत्योदय' या विचाराला प्राधान्य दिले आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू घटकांच्या उन्नतीसाठी सातत्याने कार्य करण्याची पक्षाची परंपरा असून, जालना जिल्हा कार्यालय हे त्या विचाराचे प्रभावी केंद्र बनेल. कार्यकर्ते आणि पदाधिकारी जनतेशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी या कार्यालयातून समन्वयाने कार्य करतील. प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हे कार्यालय सदैव खुले राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजपच्या जालना जिल्हा कार्यालयाच्या नव्या वास्तूचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आधुनिक सुविधा, प्रशस्त बैठक व्यवस्था आणि संघटनात्मक कामकाजासाठी आवश्यक पायाभूत सुविधांनी सुसज्ज असलेले हे कार्यालय भविष्यात जालना जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसह लोकसेवेचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखले जाईल, अशी भावना यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे १२ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या भूमिपूजन सोहळ्याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## || थोडक्यात



### शांतीब्रह्म एकनाथ महाराज पालखीचे खरवंडीत स्वागत

पाथर्डी । प्रतिनिधी

शांतीब्रह्म एकनाथ महाराज पालखीचे खरवंडी कासार येथे देवनाथ फाउंडेशन अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर दराडे तसेच खरवंडी कासार परिसरातील नाथ भक्तांनी एकनाथ महाराजांच्या पालखीला खांदा देऊन स्वागत करण्यात आले.

### जिल्हा उपनिबंधक विभागातील शरद तनपुरे यांचे निधन

जालना। प्रतिनिधी



जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथील या विभागातील कार्यालयीन अधीक्षक शरद संपतराव तनपुरे वय ५२ वर्ष यांचे अल्पसा आजाराने ८ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजी नगर येथे जीवन हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू असताना निधन झाले. त्यांच्यावर ९ ऑगस्ट रोजी राम तीर्थ स्मशानभूमी जालना येथे अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर आमदार बबनराव लोणीकर भाजप नेते भास्कर दानवे भास्करराव आंबेकर जिल्हा उपनिबंधक विष्णू रोडगे. अंबड तालुका उपनिबंधक संजय भोईटे. बदनापूर तालुका उपनिबंधक श्री बेरा यांच्यासह राजकीय क्षेत्रातील नागरिक वकील अधिकारी कर्मचारी अंत्यविधी यावेळी होते. शरद तनपुरे यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती चे सचिव भरत तनपुरे यांचे ते मोठे बंधू होते

### दलित महासंघाच्या अध्यक्षपदी विजय जाधव

जालना । प्रतिनिधी



दलित महा संघांचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी विजय जाधव यांची दलित महासंघाचे अध्यक्ष पद निवड केली आहे.दलित व वंचित समाजातील पीडित व अन्यायग्रस्त लोकांना न्याय देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे त्या दृष्टीने आपण कार्य करावे. आपल्या भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### व्यापारी महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सुरेश सारडा

जालना। प्रतिनिधी



सिद्धीविनायक सेक्युरिटी सिस्टीमचे सुरेश गणेशलाल सारडा (जालना) यांची व्यापारी महासंघाच्या जिल्हा जालना उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महासंघाचे अध्यक्ष तथा कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच यांनी १ ऑगस्ट रोजी त्यांना नियुक्तीपत्र दिले. आपण कॅट, महाराष्ट्र व व्यापारी महासंघ जिल्हा जालना यांच्या माध्यमातून व्यापाऱ्यांचे प्रश्न आणि अडीअडचणी यशस्वीरित्या सोडल्याची दखल घेऊन आपणावर ही जबाबदारी सोपविण्यात येत असल्याचे सतीश पंच यांनी नियुक्तीपत्रात म्हटले आहे. श्री. सारडा यांचे यशस्वी कार्य व सेवेमुळे जालना जिल्ह्यात व्यापारी महासंघाच्या नावलौकिकात भर पडली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा आणि इतरांनाही त्यातून प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने ही जबाबदारी त्यांना सोपवण्यात आली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या नियुक्तीबद्दल सुरेश सारडा यांचे व्यापारी वर्गातून अभिनंदन केले जात असून आगामी काळातही ते व्यापाऱ्यांचे हित जपण्यासाठी व्यापारी महासंघाचे काम अधिक प्रभावीपणे पार पाडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# वसमतमध्ये वृद्ध महिलेला फसवून सोने-चांदी लुटणारा जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, एकाचा शोध सुरू

हिंगोली। प्रतिनिधी

वसमत येथे देवदर्शनासाठी जाणाऱ्या महिलेस पाकिट पडल्याचे भासवून त्यांना बाजूला नेत त्यांच्या अंगावरील दागिने पळविणाऱ्या लातुर जिल्हयातील शिरूर ताजबंद येथील एका भामट्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी ता. ९ अटक केली असून त्याच्याकडून चोरलेला मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत तालुक्यातील पारवा येथील शांताबाई कदम ह्या बुधवारी ता. ५ वसमत येथे देवदर्शनासाठी आल्या होत्या. यावेळी दोन भामटे त्यांच्या जवळ आले. त्यांनी त्यांचे पाकिट हरविल्याचे नाटक करून शांताबाई यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर त्यांना बाजूला नेत त्यांच्या कानातील सहा ग्राम वजनाच्या सोन्याच्या काड्या व हातातील तीस तोळे वजनाचे चांदीचे कडे भामट्यांनी पळविले. भर दिवसा घडलेल्या या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली होती.

या प्रकरणी वसमत शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान, भामट्यांच्या शोधासाठी पोलिस अधिक्षक श्रेणिक लोढा, अप्पर पोलिस अधिक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक माधव जिव्हारे, जमादार शिवाजी जालमीरे, किशोर सावंत, ज्ञानेश्वर गोरे, हरिभाऊ गुंजकर, शंकर हराळ यांचे पथक स्थापन केले होते. या पथकाने रविवारी ता. ९ वसमत येथे पाहणी केली. त्यानंतर अधिक माहिती घेतली. गणेश वाघमारे (रा. शिरुर ताजबंद जि. लातुर) याच्यासह अन्य एकाने हा प्रकार केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांच्या पथकाने वसमत येथूनच गणेश यास ताब्यात घेऊन त्याची अधिक चौकशी केली असता त्याने एका साथीदारासह गुन्हयाची कबुली दिली. पोलिसांनी गणेश याच्याकडून चोरून नेलेले दागिने जप्त करून त्याला वसमत शहर पोलिसांच्या हवाली केले आहे. या प्रकरणात अन्य एकाचा शोध सुरु आहे. त्याच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली आहे.ड

# पाथर्डी घरकुल योजना बांधकाम संथ गतीने; घरकुलाची मंजुरी होईल रद्द ! कारण काय ?


पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यात मंजूर घरकुलांचे बांधकाम संथ गतीने सुरू असल्याने गटविकास अधिकारी राजेंद्र धस यांनी लाभार्थ्यांना बांधकाम तातडीने पूर्ण करण्याचा अन्यथा मंजुरी रद्द करून शासकीय पैसे वसूल करण्याचा इशारा दिला आहे पाथर्डी तालुक्यात एकूण १२,९९३ घरकुले मंजूर असून त्यापैकी १२,३५२ जणांना पहिला हप्ता मिळाला आहे मात्र अद्याप तब्बल ५,९२८ लाभार्थ्यांनी कामाला सुरुवातच केलेली नाही आणि केवळ २,१२६ घरे पूर्ण झाली आहेत या उदासीनतेमुळे पाथर्डी पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी राजेंद्र धस यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत पाथर्डी पंचायत समितीमध्ये हा कडक निर्णय जाहीर करण्यात आला आहे घरकुल योजनेचा वेग वाढवण्यासाठी २४ ग्रामविकास अधिकारी आणि ४ विस्तार अधिकारी अशा २८ जणांचे विशेष पथक तयार करण्यात आले असून हे पथक प्रत्येक गावात जाऊन लाभार्थ्यांची थेट भेट घेणार आहे विहित वेळेत काम न रकरणाऱ्यांवर घरकुल लाभार्थ्यांवर आणि निष्काळजी कर्मचाऱ्यांवरही कारवाई केली जाणार असल्याचे गटविकास अधिकारी राजेंद्र धस व पंचायत समिती प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पाथर्डीतील हातमाग विणकर कलेच्या जादूगर शितल टेके !

पाथर्डी प्रतिनिधी

डपाथर्डी तालुक्यात पाचशेहून अधिक कोष्टी बांधवांची कुटुंबे असून पारंपारिक हातमाग विणकर व्यवसाय कला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न अत्यंत जिद्दीने पैठणी कारागिराकडून सुरू आहे पंधरा हजार रुपयांपासून एक लाख रुपयांपर्यंतची पैठणी येथे हातमागावर तयार करत शितल ज्ञानेश्वर टेके यांनी स्वयंरोजगाराबरोबरच पारंपारिक विणकर कला जोपासली आहे जागतिक हातमाग दिनानिमित्त शितल टेके यांची भेट घेतली असता अत्यंत जिद्द परिश्रम व आत्मविश्वासाचे प्रत्यंतर सहजपणे मिळाले पाथर्डी शहरात सुमारे ५० वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणावर हातमाग व्यवसाय होता त्यानंतर त्यामध्ये बदल होऊन यंत्रमागावर कापड विणण्याचे काम केले जाऊ लागले राज्यभर पाथर्डीच्या विणलेल्या कपड्यांना मोठी मागणी होती अगदी कोल्हापूर इचलकरंजी सोलापूर नाशिक पर्यंत



पाथर्डीचा माल जाई काळाच्या ओघात पारंपारिक व्यवसाय बंद पडल्याने येथील बहुसंख्य कोष्टी बांधवांनी हॉटेल खानावळ चणे फुटाणे उत्पादन स्टेशनरी किराणा अशा व्यवसायामध्ये प्रवेश केला काळाच्या ओघात शिक्षणाचे प्रमाणही वाढत आहे.

विणकारांची पाथर्डी अशी ओळख मागे पडून बीड जिल्ह्यातील वडवणी येथे हा व्यवसाय सध्या काही प्रमाणात सुरू असून सर्वाधिक व्यवसाय नाशिक जिल्ह्यात येवला मनमाड अशा भागात सध्या सुरू आहे येवल्याची पैठणी याच कलेची राज्याला देणगी आहे येवल्यापूर्वी पैठण येथे या कलेची व्यावसायिक स्वरूपात बांधणी झाल्याने विणकारांनी विणलेल्या भरजरी साड्यांना पैठणी असा नामाभीधान रूढ झाले पूर्वी राजे महाराजे राजेशाही राजघराण्यातल्या स्त्रियांकडून अशा वस्त्रांचा वापर होई त्यानंतर याच वस्त्रांना पुन्हा श्रीमंत अति श्रीमंत वर्गातून मागणी वाढली शुभकार्यासाठी सध्या पैठणीची क्रेझ अजूनही टिकून आहे मात्र अशी कला अत्यंत जिद्दीने जोपासत ग्रामीण भागातील कारागीर कलेची उपासना करत आहेत कोष्टी समाजातील कार्यकर्ते प्राथमिक शिक्षक अमोल भंडारी तुषार दुधाने आदी कार्यकर्त्यांनी विणकरकला नव्या पिढीमध्ये पुनरज्जीवन करत पारंपारिक व्यवसायाला उजाळा देत स्वयंरोजगाराबाबत समाजाच्या महिलांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला येवल्यावरून यासाठी कारागीर बोलावून इच्छुक महिलांना प्रशिक्षण दिले निवडक महिलांनी यंत्रमाग सुरू करत पैठणी विणण्याचे काम सुरू केले अत्यंत सुबक व आकर्षक अशी पैठणी विणली जात असल्याने येवल्याच्या बाजारात व्यापाऱ्यांकडूनही मागणी होत आहे व्यावसायिक पातळीवरील उत्पादन करण्यासाठी तेवढ्या संख्येने स्थानिक कारागीर उपलब्ध होत नसल्याने सध्या शहरात दोन-तीन हातमाग असून शितल टेके यांच्याकडून हातमागावर दररोज किमान आठ तास काम करत दीड दोन महिन्यात एक पैठणी पूर्ण केली जाते विणलेली पैठणी पाहून खरोखरच अशी पैठणी हातमागवर तयार झाली यावर बघणाऱ्याचा चटकन विश्वास बसत नाही एवढी आकर्षक सुबक अशी पैठणी तयार होते शितल टेके यांनी आपली मुलगी अदिती हिला सुद्धा विनकला शिकविली आहे डी.एड.शिक्षण होऊन सुद्धा नोकरीच्या शोधात न फिरता व्यवसाय निवडत जिद्दीच्या बळावर सामान्य कुटुंबातील महिलेने स्वतःची ओळख दिली आहे पंधरा दिवसांपासून दोन महिन्यांपर्यंत प्रतवारी व दर्जानुसार एक पैठणी तयार होते गेल्या पाच वर्षांपासून सुरू केलेला व्यवसाय आता स्थिरावत आहे हातमागाच्या माध्यमातून विणकर कला जिवंत ठेवून पाथर्डीची ओळख पूर्वीप्रमाणे विणकारांची पाथर्डी अशी होईल असा विश्वास शितल टेके यांनी व्यक्त केला आहे.

# समृद्धी महामार्गावर मेंढ्यांच्या कळपासह गायींचा वावर

## अपघाताचा धोका वाढला, टोलवसुली चोख, कॅमेरे-गस्तीचे दावे, प्रवाशांच्या जिवाशी खेळ

वैजापूर। प्रतिनिधी

टोल वसुलीत काटेकोरपणा, वेगावर नजर ठेवणारी यंत्रणा, ठिकठिकाणी कॅमेरे अन्? गस्तीचे दावे; पण प्रवाशांच्या जीवाशी थेट संबंध असलेल्या सुरक्षेचे काय? ताशी १२० किलोमीटर वेगाने वाहने सुसाट धावणाऱ्या समृद्धी महामार्गाच्या वैजापूर-छत्रपती संभाजीनगर पट्ट्यात मेंढ्यांचे अख्खे कळप आणि गायी थेट गार्डरेलपर्यंत पोहोचत असल्याचे वास्तव 'दिव्य मराठी'च्या प्रत्यक्ष पाहणीत समोर आले आहे.

हा प्रकार एखाद्या दिवसापुरता मर्यादित नसून पावसाळ्यात महामार्गालगत हिरवळ वाढल्यापासून वारंवार दिसत असल्याचे चित्र आहे. काही पशुपालक जनावरे चरण्यासाठी या भागात आणत असल्याने धोका वाढला आहे. मुख्य मार्गिकेलगत लोखंडी गार्डरेल, त्यापलीकडे संरक्षित



पट्टा आणि बाहेरील बाजूस सिमेंटचे कुंपण असतानाही एवढा मोठा कळप आत पोहोचतोच कसा, हा प्रश्न आहे. काही मेंढ्या तर गार्डरेलखालून डोके काढून रस्त्याच्या अगदी कडेपर्यंत आल्याचे कॅमेऱ्यात कैद झाले. जनावरांची ही 'एन्ट्री' गस्त आणि देखरेखीच्या नजरेतून वारंवार कशी सुटते? एखादा कळप क उधळून मुख्य मार्गिकेत घुसला, तर चालकाला सावरण्यासाठी काही सेकंदही मिळणार नसल्याची स्थिती आहे. फोटो टिपण्यासाठी जागेवर पोहोचलो अन्? समोरचे दृश्य पाहून क्षणभर धडकीच भरली. गार्डरेलला खेटून मेंढ्यांचा कळप, काही अंतरावर गाय आणि अगदी बाजूने सुसाट धावणारी वाहने. कॅमेऱ्याची प्रत्येक फ्रेम टिपताना एकच प्रश्न पडत होता, एखादे जनावर अचानक रस्त्यावर आले तर वाहनचालकाला सावरण्यासाठी वेळ तरी किती मिळणार? असा प्रश्न आहे. या गंभीर प्रकाराबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच समृद्धी महामार्गाच्या संबंधित अधिकाऱ्यांची बाजू जाणून घेण्यासाठी अनेकवेळा दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी फोन स्वीकारला नाही. त्यामुळे त्यांची अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही. महामार्गाच्या बाह्य हद्दीला सिमेंट पॅनलची भिंत उभारण्यात आली आहे. तरीही आतील भागात पशुधन पोहोचत असल्याने संपूर्ण पट्ट्याची तपासणी आवश्यक ठरते. कुठे पॅनल तुटले आहे, कुठे मोकळी जागा आहे जोडरस्त्याजवळून प्रवेश मिळतो आहे का, याचा शोध घेऊन जागांची नोंद करणे महत्त्वाचे आहे. ११ डिसेंबर २०२२ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत समृद्धी महामार्गावर ४९१ अपघातांत ४४४ जणांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी आहे. अपघातांमागील चालकांच्या चुकांसोबत रस्त्यालगतचे संभाव्य धोके, वन्यप्राण्यांचा प्रवेश आणि प्रतिबंधात्मक उपायांचाही स्वतंत्रपणे आढावा घेण्याची गरज आहे. हडसपिंपळगाव शिवारातील चॅनल क्रमांक ४७१ जवळ ३० जुलैच्या रात्री अचानक रानडुक्कर समोर आल्याने काही क्षणांच्या अंतराने दोन वाहने अपघातग्रस्त झाली. दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले; सुदैवाने प्रवासी बचावले. वन्यप्राण्यांचा प्रवेश केवळ शक्यता नसून प्रत्यक्ष अपघाताचे कारण ठरत असल्याचे चित्र आहे.

# जिल्ह्याचे पालक अधिकारी एवढे असंवेदनशील कसे?

## विलास घुले मृत्यूप्रकरणी उपोषणाचा पाचवा दिवस; भावाची प्रकृती खालावली; गरोदर पत्नी पाच दिवस उपाशी

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील टाकळी येथील रहिवासी असलेले विलास घुले यांच्या खून प्रकरणी न्याय मागण्यासाठी बसलेला त्यांचा भाऊ रमेश घुले, पाच महिन्याची गरोदर असलेली पत्नी आणि इतर कुटुंबीय गेल्या पाच दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसलेले आहेत. मात्र या जिल्ह्याचे पालक जिल्हा अधिकारी आणी पोलीस अधीक्षक यांनी किमान या ठिकाणी भेट देऊन त्यांची माहिती तरी घ्यायला हवी होती. मात्र कर्तव्यदक्ष असलेले हे अधिकारी एवढे असंवेदनशील आणि निष्ठूर कसे झाले? हा मोठा प्रश्न आहे. पोलीस महासंचालक परवा या ठिकाणी आले होते.ते या ठिकाणी भेट देणार होते. मात्र ही भेट झाली नाही. शेवटी विलास घुले यांच्या आईला पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून या ठिकाणी त्यांच्याशी चर्चा केली. ही चर्चा उपोषण स्थळी व्हायला हवी होती. मात्र ती झाली नाही की होऊ दिली नाही? हा मोठा प्रश्न आहे.







गेल्या काही दिवसापूर्वी एका प्रेम प्रकरणातून ढाबाचालक विलास घुले याला मारहाण करण्यात आली होती. यातच त्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर अनेक आरोपींना अटक झाली. मात्र यातील मुख्य आरोपी पोलिसांनी या तपासात अटक केला नाही अशी त्यांची मागणी होती. कोणाला अटक करायचे किंवा नाही हा प्रश्न पोलीस यंत्रणेचा असला तरी गेल्या पाच दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसलेल्या विलास घुले यांचे भाऊ रमेश घुले व पाच महिन्याची गरोदर पत्नी आपल्या कुटुंबीयांसह उपोषण करतात. याची दखल घेणे गरजेचे होते. माणूस म्हणून जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी या कुटुंबीयांची भेट घेऊन किमान त्यांचे समाधान करणे आवश्यक होते. मात्र तरीही या जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील अधिकाऱ्यांनी या कुटुंबीयांची भेट घेतली नाही. परवा बीड शहरांमध्ये पोलीस महासंचालक आले होते. त्यांनी परळीला जाऊन महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेतली तशाच पद्धतीने या उपोषण कर्त्यांचीही भेट घेणे आवश्यक होते किंवा त्यांचे म्हणणे काय आहे हे ऐकून घेणे गरजेचे होते. मात्र ही भेट झाली नाही पोलीस महासंचालक उपोषण स्थळी आले नाहीत की त्यांना येऊ दिले नाही? हा मोठा प्रश्न आहे. याबाबत लोक आता चर्चा करू लागले आहेत. शेवटी विलास घुले यांच्या आईला पोलिस अधीक्षक ◀◀ पान ३ वर

## माजी आमदार मोहनराव काका सोळंके यांना मातृशोक

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजी आमदार मोहनराव काका सोळंके यांच्या आई रतनबाई दिगंबरराव सोळंके (९८ वर्षे) यांचे दि ०९ ऑगस्ट रविवार रोजी सकाळी १०:०० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले



माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मोहनराव सोळंके यांच्या मातोश्री रतनबाई दिगंबरराव सोळंके (९८ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.त्या अत्यंत मनमोकळ्या स्वभावाच्या असल्याने त्यांच्या निधनाने परीसरात शोककळा पसरली आहे.त्यांच्या पार्थिवावर सादोळा येथील स्मशानभूमीत सायंकाळी ५:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक पत्रकार, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पाश्चात माजी आमदार मोहनराव (काका) सोळंके यांच्यासह तीन मुले,मुली सुना नातवंडे असा परिवार आहे.माजी आमदार मोहनराव काका सोळंके यांच्या दुःखात दै राज्य लोकतंत्र परीवार सहभागी आहे.

## उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली परळीच्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे १४ ऑगस्टला भूमीपूजन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शहराच्या विकासात मैलाचा दगड ठरणाऱ्या आणि ५६५ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमीपूजन येत्या १४ ऑगस्ट रोजी उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते आणि पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमाची प्रशासनाकडून सध्या तयारी सुरू झाली आहे.

शुक्रवार १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता ग्रामीण पोलीस ठाण्याजवळ असलेल्या टेकडीवरील मैदानात हा भूमीपूजन कार्यक्रम पार पडणार आहे.उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार १४ ऑगस्टला तर ना.





पंकजाताई मुंडे १३ तारखेला परळीत येणार आहेत. कार्यक्रमास आ. धनंजय मुंडे यांच्यासह जिल्हयातील सर्व आमदार, लोकप्रतिनिधी, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

ना. पंकजाताई मुंडेंचा सिंहाचा वाटा

परळीला पशुवैद्यकीय महाविद्यालय निर्माण करण्यात ना. पंकजाताई मुंडे यांचा सिंहाचा वाटा आहे. या खात्याची मंत्री झाल्यानंतर त्यांनी परळी येथे व त्यावेळचे उप मुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या आग्रहामुळे बारामती येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळीच्या महाविद्यालया साठी ५६४ कोटी ५८ लाख इतका निधी देखील मंजूर केला. आता १४ तारखेला याचे भूमीपूजन होत आहे.

४१ हेक्टर जमीनीवर उभे राहणार महाविद्यालय

महाविद्यालय उभारणीसाठी जमीन संपादनाची सर्व कार्यवाही पूर्ण झालेली आहे.परळी तालुक्यातील मौजे लोणी येथील गट क्र. ०७ ◀◀ पान ३ वर

## रंजेगाव येथे तीन ठिकाणी घरफोडी

नाथापूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील रंजेगाव येथे तीन ठिकाणी चोरीची घटना घडली. यामुळे गावातील व परिसरातील नागरिकांमध्ये मोठे भीतीचे वातावरण झाले आहे. दिवसभर शेतीचे कामे करून रात्री झोपेचा फायदा घेत चोरांनी तीन ठिकाणी सोने नगद पैसे चोरून पसार झाले आहेत. ही चोरीची घटना बीटे हनुमान, निकम सुनील, तायड चंद्रकांत यांच्या घरात घुसून चोरी करण्यात आली यापूर्वी या परिसरात अनेक ठिकाणी अशा चोरीच्या घटना घडल्या आहेत आजपर्यंत एकही चोरीची घटना आतापर्यंत उघडकीस झाली नाही यामुळे गावातील नागरिकांमध्ये भीती निर्माण होत आहे तरी पोलिसांनी याचे गांभीर्य घेऊन रात्रीचे गस्त वाढून चोराचा बंदोबस्त करावा केल्यास चोरांचे मनोबल खचून जाईल व पुढील चोरी होणार नाही आणि नागरिकांना या भीतीपासून दिलासा मिळेल ही घटना पिंपळनेर पोलीस स्टेशन च्या हद्दीत असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## तोहीद खान हत्याकांडातील कुटुंबाला वक्फ बोर्डाची मदत

### ना.समीर काझी यांनी दिलेला शब्द पाळला

परळी । प्रतिनिधी

परळी येथील ३६ वर्षीय तोहीद खान उर्फ अफजल खान यांची आर्थिक वादातून ३१ मे २०२६ रोजी हत्या करून मृतदेह रेल्वे रुळावर टाकण्यात आल्याच्या घटनेने राज्यभरात खळबळ उडाली होती. या हत्याकांडानंतर राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना. समीर काझी यांनी परळी येथे भेट देऊन खान कुटुंबीयांचे सांत्वन केले होते. त्यावेळी त्यांनी राज्य वक्फ बोर्डाच्या वतीने तोहीद खान यांच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले होते.



जाहीर केलेली मदत प्रत्यक्षात सुपूर्द करण्यात आली.

अनेकांनी खान कुटुंबीयांची भेट घेऊन विविध स्वरूपाची मदत करण्याचे आश्वासन दिले. मात्र, प्रत्यक्ष आर्थिक मदत किंवा अन्य स्वरूपाची मदत देण्यात आली नसल्याची चर्चा होती. अशा परिस्थितीत 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले' या उक्तीप्रमाणे ना. समीर काझी यांनी दिलेला शब्द पाळत शनिवारी, ८ ऑगस्ट रोजी राज्य वक्फ बोर्डाच्या वतीने जाहीर केलेल्या एक लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश तोहीद खान यांच्या पत्नी व वडिलांकडे सुपूर्द केला. हा धनादेश छोटेखानी कार्यक्रमात कुटुंबीयांकडे देण्यात आला. ◀◀ पान ३ वर

## एफडीएच्या बेकायदेशीर कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाचा दणका

### निळकंठेश्वर दुध संकलन केंद्राचा परवाना निलंबन आदेशास स्थगिती दिली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अन्न व औषध प्रशासन विभागाने नोटीस व सुनावणीची संधी न देता निळकंठेश्वर दुध संकलन केंद्र (डेअरी), किल्लारी, जि. लातूर यांचा परवाना निलंबित केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण हस्तक्षेप करत ऋऊ-चा ७ जुलै २०२६ रोजीचा निलंबन आदेश स्थगित केला आहे. याबाबतचा महत्वपूर्ण अंतरिम आदेश न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांनी २८ जुलै रोजी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.



याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. अश्विनी अण्णासाहेब लोमटे यांनी प्रभावी युक्तिवाद करताना न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, संबंधित डेअरीचा परवाना कोणतीही पूर्वसूचना अथवा सुनावणीची संधी न देता केवळ संशयाच्या आधारावर निलंबित करण्यात आला आहे. तपासणी अहवालात डेअरीमध्ये कोणतेही भेसळयुक्त, अपायकारक अथवा आक्षेपार्ह साहित्य आढळून आले नसतानाही प्रशासनाने कठोर कारवाई केली, जी कायद्याच्या चौकटीबाहेरची असल्याचे त्यांनी न्यायालयासमोर मांडले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करणे प्रशासनासाठी बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले. संबंधित पक्षाला आपली बाजू मांडण्याची संधी न देता परवाना निलंबित करणे ही कायदेशीर प्रक्रियेच्या विरोधातील बाब असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

या पार्श्वभूमीवर न्यायालयाने ऋऊ-चा ७ जुलै २०२६ रोजीचा परवाना निलंबन आदेशास स्थगिती देऊन दुध संकलन केंद्राला दिलासा दिला. राज्यातील दुग्ध व्यवसाय आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रासाठी हा निकाल महत्त्वाचा मानला जात असून, प्रशासकीय अधिकारांचा वापर करताना कायदेशीर प्रक्रिया व नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचा स्पष्ट संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे. तसेच, केवळ संशयाच्या आधारावर कोणत्याही व्यावसायिक संस्थेवर कारवाई करता येणार नाही, असेही या निकालातून अधोरेखित झाले आहे.

## चौसाळा शाळेत पालक शिक्षक मेळावा




चौसाळा । प्रतिनिधी

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा येथे पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्यातील समन्वय तसेच विद्यार्थी गुणवत्ता तसेच काही समस्या पालकांच्या शाळेविषयी लोक सहभाग तसेच शिक्षक शाळेत राबवत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमाविषयी माहिती पालकांना व्हावी या उद्देशाने पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री लक्ष्मण राऊत व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंम्पे शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक सभागृह येथे सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली त्यानंतर मंचावर उपस्थित असणारे प्रमुख पाहुणे यामध्ये ◀◀ पान ३ वर

## अखिल भारत हिंदू महासभेच्या महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुखपदी रूपाली देशपांडे

बीड । प्रतिनिधी

अखिल भारत हिंदू महासभेच्या महिला आघाडीच्या बीड जिल्हाप्रमुख पदावर सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या रूपाली देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष किरण चव्हाण यांनी नियुक्तीपत्र प्रदान करून ही नियुक्ती जाहीर केली.



रूपाली देशपांडे या सामाजिक, महिला सक्षमीकरण, जनजागृती तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर महिला आघाडीच्या बीड जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर रूपाली देशपांडे यांनी संघटनेच्या राष्ट्रीय नेतृत्वाचे आभार व्यक्त करताना, महिलांचे सक्षमीकरण, समाजात जनजागृती, सामाजिक ऐक्य, सेवा कार्य आणि सर्व समाजघटकांना सोबत घेऊन संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन, असा विश्वास व्यक्त केला.

## परळीत १० ऑगस्टला आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली विराट महामोर्चा

माजलगाव । प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या अ, ब, क, ड उपवर्गीकरणाच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी अनुसूचित जाती अ, ब, क, ड उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता परळी शहरातील मोंढा मार्केट येथून विराट महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चाचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष, सरसेनानी आनंदराज आंबेडकर करणार असून, मराठवाड्यातील विविध सामाजिक संघटना, आंबेडकरी चळवळीतील



**मराठवाड्यातील आंबेडकरी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : विजयदादा साळवे**

कार्यकर्ते, युवक, महिला तसेच संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

अनुसूचित जातींचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्यात येऊ नये, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. संविधानाने दिलेले समान हक्क, सामाजिक न्याय आणि आरक्षणाचे संरक्षण यासाठी हा महामोर्चा काढण्यात येत असल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची दिशा अनुसूचित ◀◀ पान ३ वर

## तुकाराम मुंडे यांच्या जिवनावरील 'तुकाराम' पुस्तकाचे बीड शहरात ११ ऑगस्टला लोकार्पण

बीड । प्रतिनिधी

सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या जीवनप्रवासावर आधारित ज्येष्ठ पत्रकार व लेखक शफी पठाण लिखित 'तुकाराम' या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ वाजता बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. बिंदुसरा सांस्कृतिक सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या पुढाकारातून या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महादेव धांडे यांनी दिली.

या सोहळ्यात संपादक, प्रसिद्ध लेखक व वक्ते संजय आवटे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.




मनोहर चासकर, कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड हे राहणार आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्याधिकारी जिल्हा परिषद जतिन रहमान, माजी सनदी अधिकारी अशोकराव मुंडे तसेच पुस्तकाचे लेखक शफी पठाण यांचा समावेश आहे.

'तुकाराम' या पुस्तकातून तुकाराम मुंडे यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील विविध टप्पे, संघर्षमय वाटचाल, निर्णयक्षम नेतृत्व आणि लोकाभिमुख प्रशासनाचा प्रवास उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन बिंदुसरा सांस्कृतिक सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महादेव धांडे, कार्याध्यक्ष प्रमोद मंत्री, उपाध्यक्ष सुनील माने, डॉ. बळीराम गवते आणि सचिव प्राचार्य दिनकर तेलप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. आयोजन समितीमध्ये बप्पासाहेब तळेकर, भाई बाळासाहेब घुमरे, इंजि.गोविंद कदम, ड. योगेश शिंदे, प्रा. चाँद पटेल, सुहास सर्वज्ञ , ड. सुरेश वडमारे, ड. सादेक शेख, आनंद सारडा, सुरेश माने आणि पत्रकार रवी उबाळे , ड. जयंत राख हे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. साहित्य, प्रशासन, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी या लोकार्पण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### बीडच्या मातीतून घडलेला कर्तृत्ववान प्रशासक

बीड जिल्ह्यातील मातीत जन्मलेले तुकाराम मुंडे यांनी आपल्या प्रामाणिक, पारदर्शक आणि जनहितैषी प्रशासनामुळे राज्यभर स्वतंत्र ओळख निर्माण केली. विविध महापालिका आणि शासकीय विभागांमध्ये काम करताना त्यांनी शिस्त, भ्रष्टाचाराविरोधातील ठाम भूमिका आणि लोककेंद्रित निर्णयांमुळे विशेष ठसा उमटवला. त्यांच्या प्रशासकीय प्रवासावर आधारित 'तुकाराम' या पुस्तकाचे लोकार्पण आता त्यांच्या जन्मभूमी असलेल्या बीडमध्ये होत आहे, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. बीडच्या भूमीतून घडलेल्या एका कर्तृत्ववान अधिकाऱ्याचा प्रेरणादायी प्रवास या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांसमोर येणार आहे.

### एक लाख पुस्तकाची हातोहात विक्री

ज्येष्ठ पत्रकार शफी पठाण लिखित 'तुकाराम' या पुस्तकाचे प्रकाशन पुणे येथे करण्यात आले. या प्रकाशानाच्या दिवशीच सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या जिवनावर लिहिलेल्या या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची विक्री झाली. याबाबत प्रकाशकांनीही आश्चर्य व्यक्त केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26